नियमित दिवाणी दावा कमांक ६७७/२०१२ मधील निशाणी २१ खालील आदेश

१. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज आदेश २६ नियम ९ दिवाणी प्रकिया संहिता अन्वये वादी विरुध्द दाखल केला आहे. प्रतिवादीने अशा प्रकारे मागणी केली आहे की, निमताना मोजणी वरिष्ठ अधिकारी मार्फत दावा मिळकतीची निमताना मोजणी करण्यात यावी.

२. प्रस्तुत अर्जाची थोडक्यात वस्तुस्थिती अशा प्रकारे आहे की, प्रतिवादी कथन करतात की, वादीने गट कमांक ७९५ ची मोजणी मोजणी रजिस्टर कमांक १७४ ने करुन घेतली आहे आणि त्या मोजणीमध्ये प्रतिवादीने दावा मिळकतीत अतिकमण केल्याचे आढळुन आलेले नाही. परंतु, वादीने न्यायालया मार्फत गट कमांक ७९५ व गट कमांक ८२६ ची जी मोजणी करुन घेतली आहे त्यामध्ये प्रतिवादीने गट कमांक ७९५ मध्ये एक गुंठयाच्या क्षेत्रफळामध्ये अतिकमण केल्याचा अहवाल आहे. परंतु, तो न्यायिक आयोगाचा अहवाल प्रतिवादीला मान्य व कबूल नाही. प्रतिवादी कथन करतात की, हद्दीप्रमाणे वादी व प्रतिवादी हे मिळकतीत वहिवाट करत आहेत आणि प्रतिवादीच्या मिळकतीमध्ये पाण्याचा हौद व बांध आहे आणि म्हणून प्रतिवादीचा असा दावा आहे की न्यायिक आयोगाची नेमणूक होवुन जो मोजणी नकाशा तयार करण्यात आलेला आहे त्यामध्ये प्रतिवादीने गट कमांक ७९५ मध्ये एक गुंठयाचे अतिकमण केलेले क्षेत्रफळ चुकीचे दर्शविण्यात आले आहे आणि त्यामुळे न्यायिक अहवालच चुकीचा आहे आणि त्यामुळे गट कमांक ७९५, ८२६ आणि ८२७ ची निमताना मोजणी वरिष्ठ आधिकारी मार्फत करणे आवश्यक झाले आहे. प्रतिवादीने मागणी केली आहे की, निमताना मोजणी करण्यासाठी निमताना मोजणी वरिष्ठ अधिका-याची न्यायिक आयोग म्हणून नेमणूक करण्यात यावी व निमताना मोजणीदाराला गट कमांक ७९५, ८२६ आणि ८२७ ची मोजणी चतु:सिमेसकट तयार

करण्याचे निर्देश व वादी व प्रतिवादी दाखवतील त्या प्रमाणे वस्तुस्थितीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात यावेत. प्रतिवादीने, विनंती केली आहे की, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा. म्हणून प्रस्तुतचा अर्ज.

३. वादीने म्हणणे निशाणी २१ ला दाखल केले आहे. वादीने प्रस्तुतच्या अर्जाला जोरदार विरोध केलेला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार न्यायिक आयोगा मार्फत गट कमांक ७९५ ची मोजणी करण्यात आली होती त्या मोजणीमध्ये प्रतिवादीने अतिक्रमण केल्याचे शाबित झालेले आहे आणि त्या प्रमाणे न्यायिक आयोगाचा अहवाल व नकाशा दप्तरी सदरी आलेला आहे आणि प्रतिवादीच्या मिळकतीमध्ये बांध व हौद नाही असा वादीचा दावा आहे. त्यामुळे निमताना मोजणीची मुळातच आवश्यकता नाही. वादीने मागणी केली आहे की, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. वादीने विनंती केली आहे की, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. प्रस्तुतच्या अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांच्या वकीलांना ऐकले. युक्तीवाद व पुरावा विचारात घेता खालीलप्रमाणे मुद्दे निकालासाठी माझ्या विचारार्थ आले आहेत. मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसा सहित खालीलप्रमाणे नमुद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी सिध्द करतात का की निमताना मोजणी अधिकारी मार्फत गट कमांक ७९५, ८२६ आणि ८२७ च्या चतु:सिमेच्या हद्दी व वस्तुस्थितीचे स्थानिक सर्व्हेक्षण करण्याची आवश्यकता आदेश २६ नियम ९ दिवाणी प्रकिया संहिता अन्वये आहे ? | होकारार्थी |
| २. | कोणत आदेश ? | अर्ज मंजूर |

# का र ण मि मां सा

५. मुद्दा कमांक १ साठी:-

दोन्ही पक्षकारांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. युक्तीवाद व दस्तऐवजी पुरावा मोजणी नकाशा विचारात घेता स्पष्ट होते की, वादी व प्रतिवादी दरम्यान असा वादीत मुद्दा आहे की न्यायिक आयोग मार्फत गट कमांक ७९५ व ८२६ ची जी मोजणी करण्यात आली होती आणि त्या मोजणीच्या अहवाला नुसार प्रतिवादी गट कमांक ७९५ या मिळकतीत एक गुंठयाचे अतिकमण प्रतिवादीने केले आहे. परंतु, न्यायिक आयोग अहवाल मुळीच प्रतिवादीला मान्य नाही म्हणून प्रतिवादीने निमताना मोजणी वरिष्ठ अधिकारी मार्फत करण्याचा दावा केलेला आहे. जेणे करुन गट कमांक ७९५, ८२६ आणि ८२७ चा मोजणी नकाशा चतु:सिमेसह व वादी व प्रतिवादी दाखवतील त्याप्रमाणे वस्तुस्थिती दप्तरी सदरी येण्यासाठी मदत होणार आहे आणि प्रतिवादीचे मिळकतीमध्ये पाण्याचा हौद व बांध आहे की नाही ही सुध्दा वस्तुस्थिती दप्तरी सदरी येण्यासाठी मदत होणार आहे. आदेश २६ नियम ९ दिवाणी प्रकिया संहिताच्या तरतुदी प्रस्तुत अर्जाच्या वस्तुस्थितीला लागू केल्यानंतर स्पष्ट होते की गट कमांक ७९५, ८२६ आणि ८२७ च्या चतु:सिमा व वादी व प्रतिवादी दाखवतील त्या वस्तुस्थितीचा स्थानिक सर्व्हेक्षण निमताना वरिष्ठ अधिकारी मार्फत होणे योग्य होणार आहे. कारण, प्रतिवादीला न्यायिक आयोगाचा अहवाल मुळीच मान्य नाही. कारण, त्या अहवालामध्ये प्रतिवादीचे गट कमांक ७९५ मध्ये एक गुंठयाच्या क्षेत्रफळामध्ये अतिकमण दाखविले आहे म्हणून प्रतिवादीला वादील न्यायिक आयोगाचा अहवाल मान्य नाही. मी या निष्कर्षास पोहचली आहे की, प्रतिवादीने सिध्द केले आहे की गट कमांक ७९५ चा न्यायिक आयोगाचा अहवाल त्यांना मान्य नाही व प्रतिवादीने गट कमांक ७९५ मध्ये एक गुंठयाच्या क्षेत्रफळामध्ये अतिकमण केले आहे हा न्यायिक आयोगाचा अहवाल सुध्दा मान्य नाही आणि म्हणून निमताना मोजणी वरिष्ठ अधिकारी मार्फत होणे गरजेचे आहे. सबब, माझे उत्तर मुद्दा कमांक १ ला होकारार्थी आहे.

६. <u>मुद्दा कमांक २ साठी:-</u>

मुद्दा कमांक १ चे होकारार्थी निष्कर्ष विचारात घेता स्पष्ट होते की, प्रतिवादीने मागणी केलेली दाद की, निमताना मोजणी वरिष्ठ अधिकारी मार्फत गट कमांक ७९५, ८२६ आणि ८२७ ची मोजणी नकाशासकट चतु:सिमा व वादी व प्रतिवादी दाखवतील त्याप्रमाणे वस्तुस्थिती न्यायिक आयोगाच्या अहवालाने सादर करावी ही दाद मंजूर होण्यास पात्र आहे. मी या निष्कर्षास पोहचली आहे की, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा कमांक २ च्या उत्तरास मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर.

२. निमताना मोजणी वरिष्ठ अधिका-याची न्यायिक आयोग म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

३. निमताना मोजणीचे वरिष्ठ अधिका-याला निर्देश देण्यात येतो की मौजे-बहे स्थित गट कमांक ७९५, ८२६ आणि ८२७ ची मोजणी चतु:सिमेसह व वादी व प्रतिवादी दाखवतील त्या वस्तुस्थिती प्रमाणे करावी व न्यायिक आयोगाचा अहवाल मोजणी नकाशासकट आदेश तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत सादर करावा.

४. प्रतिवादीने निमताना आयोग न्यायिक शुल्क रक्कम रुपये २,०००/- (रक्कम रुपये दोन हजार मात्र) नियमा प्रमाणे भरणा करावी.

५. येणेप्रामणे रिट जारी करण्यात यावे.

तारीख: २४/०६/२०१५

(वै.म. गोतसुर्वे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
इस्लामपूर